॥ ती येते आणिक जाते ॥

गायकः महेंद्र कपूर
गीतः आरती प्रभू
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

ती येते आणिक जाते,
येतांना कधिं कळ्या आणिते,
जातांना पण फुलें मागते।
येणें जाणें, देणें घेणें
असतें गाणें जें न कधीं ती म्हणते ॥१ ॥

येतांना कधिं अशी लाजते
तर जातांना ती लाजविते;
कळतें कांहीं उगीच तेंही,
नकळत पाही कांहींबाहीं,
अर्थावांचुन असतें "नाहीं", "हो", हीं म्हणते ॥२ ॥

येतांनाची कसली रीतः
गुणगुणते ती संध्यागीत,
जातांना कधिं फिरून येत,
जाण्यासाठिंच दुरून येत,
विचित्र येते, विरून जते जी सलते ॥३ ॥

कळ्याफुलांच्या मागें येते,
कोमट सायंचेहरा घेते,
उदी उदासी पानीं भरते,
"मी येऊं रे?" ऐकूं येतें,
मध्यरात्रभर तेच तेच ते प्रतिध्वनी ते ॥४ ॥